# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६**

☎ २५६५६२३४ **Email :** ropune.dte@gmail.com **Web Site: ropune.org.in**

जा क्र — तंशिविकापु/विवि/नवीन संस्था /२०१७/ 596 दिनांक — १३/०२/२०१७

प्रति

प्राचार्य / संचालक

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व विद्यमान पदवी / पदव्युत्तर पदवी /

पदव्युत्तर /पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय - शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत.......

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरु असलेल्या संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /प्रवेश क्षमता वाढ / पी. आय. ओ. / एन. आर. आय. कोटा/ इंटीग्रेटेड कॅम्पस इत्यादी प्रस्तावाचे अनुषंगाने सुनावणीसाठी **दिनांक १५/०२/२०१७** रोजी उपस्थित रहाण्याबाबत.

संदर्भ — १) संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसुचना क्रमांक २(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/४८ दिनांक १२/०१/२०१७.

२) संचालनालयाने परिपत्रक्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१७/१४७ दिनांक ०३/०२/२०१७

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/नवीन संस्था /२०१७/४१७ दिनांक ०४/०२/२०१७.

४) संचालनालयाने परिपत्रक्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१७/१७७ दिनांक १०/०२/२०१७.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका या स्तरावरील ज्या विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /प्रवेश क्षमता वाढ / पी. आय. ओ. / एन. आर. आय. कोटा/भारतीय कामगारांच्या मुलांकरीता नवीन जागा उपलब्ध करणे/ इंटीग्रेटेड कॅम्पस / डयुअल डिग्री कोर्स इत्यादी करीता प्रस्तावा सादर केलेले असतील अशा संस्थांना दिनांक ०७/२/२०१७ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई. येथे सुनावणीसाठी उपस्थित रहाण्याबाबत संदर्भ पत्र क्र ३ व्दारे कळविण्यात आलेले होते.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ४ व्दारे मा.संचालक यांनी ज्या संस्था दिनांक ०७/०२/२०१७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित नव्हत्या अशा संस्थांन पैकी **ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद /फार्मसी कौन्सिंल ऑफ इंडीया यांचेकडे अर्ज / प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यांनी दिनांक १५/०२/२०१७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित रहावे व ज्या संस्थांनी वास्तूकला परिषद, नवी दिल्ली यांचे कडे अर्ज /प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा संस्थांनी दिनांक २२/०२/२०१७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित रहावे असे आदेश दिलेले आहेत. सुनावणीसाठी जाताना संदर्भ पत्र क्र ४ मध्ये दिलेल्या सुचनांनुसार आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह प्राचार्यानी व्यक्तीशः उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. उपरोक्त दिनांकानंतर सुनावणी होणार नाही याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी. सोबत संदर्भिय पत्र क्र ४ ची छायाप्रत जोडलेली आहे.**

प्र सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१७/१७८७

दिनांक : 10 FEB 2017

पहा : १) या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/४८, दि. १२ जानेवारी, २०१७

२) या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१७/१४७, दि. ०३.०२.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील ज्या विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी नवीन अभ्यासक्रम, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पीआयओ / एनआरआय च्या नवीन जागा यासाठी शिखर परिषदांकडे अर्ज केलेल्या संस्थाची दि. ०७.०२.२०१७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. **दि. ०७.०२.२०१७ रोजीच्या सुनावण्यासाठी ज्या संस्था उपस्थिती नव्हत्या त्यांचेसाठी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे अंतिम सुनावणी घेण्यात येणार असून यानंतर सुनावणी होणार नाही याची संबंधित संस्थानी नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव सादर केलेले समुचित प्राधिकारण | सुनावणीचा दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण दिल्ली / फार्मसी कौंसल ऑफ इंडीया | दि. १५.०२.२०१७ (सकाळी १०.३० ते दुपारी १.०० ) | तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुंबई |
| २ | वास्तूकला परिषद, नवी दिल्ली | दि. २२.०२.२०१७ (सकाळी १०.३० ते दुपारी १.०० ) | |

विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी वरील प्रस्तावांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील माहिती भरल्यानंतर ॲप्लीकेशन पार्ट १, पार्ट २ व डेफीसिअन्सी रिपोर्ट हे दस्तावेज अपलोड करुन भलेलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करून उपरोक्त सुनावणीस उपस्थित रहावे. संबंधित संस्थानी वरील अर्जाच्या सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया यांना सादर केलेला प्रस्ताव व सदर प्रस्तावातील माहितीच्या पृष्ठर्थची मुळ दस्तावेज, सन २०१७-१८ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीशः उपस्थित रहावे.

१. संस्थेचा ठराव.

२. नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी अॅक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
३. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
४. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office ]
६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत
७. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर अॅनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
८. जमीन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना आपल्या अधिपत्याखालील येणा-या संस्थाना आपले स्तरावरुन कळविण्यात याव्यात
२) सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /खाजगी विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३) सिस्टीम मॅनेजर, कार्या सन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.